महाराष्ट्र शासन
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६**

फोन नं. ०२०-२६१२२१११९ Web : www.dhepune.gov.in Email : law.dhepune@nic.in

क्र. विधी- ३८२५/प्र.क्र. १३४(ई-२०४६५०५)/सीईटीसेल/ दिनांक :

**परिपत्रक -**

**विषय : केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे विधी ३ आणि ५ वर्षीय अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदल करण्याबाबत . . .**

वाचा : १. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८.
२. शासन अधिसूचना क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३(भाग-२)/मशि-२, दि.५.५.२०१७.
३. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दिनांक १२.०५.२०१७.
४. शासन अधिसूचना क्र. विधी-२०२३/प्र.क्र.७९/मशि-२, दिनांक ३०.०६.२०२३.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विधी ३ व ५ वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम दिनांक ०५.०५.२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग चार-ब) अन्वये प्रसिध्द करण्यात आले असून, सदरहू विनियमामध्ये शासन अधिसूचना दिनांक ३०.०६.२०२३ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे.

सदरहू नियम तसेच शासन निर्णय दिनांक १२.०५.२०१७ च्या अनुषंगाने शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित / राज्यातील अकृषि विद्यापीठांद्वारे संचलित महाविद्यालये/ विद्यापीठ विभागामधील विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदल करण्याकरिता खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही.
२. ज्या विद्यार्थ्यांनी, केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (कॅप) प्रवेश घेतलेला असेल असे विद्यार्थी, संस्था किंवा पाठ्यक्रम बदलून घेण्यास पात्र असतील.
३. **विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्था, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था कोणत्याही टप्प्यावर बदलून घेता येणार नाही. तथापि, शासकीय किंवा शासकीय अनुदानित,**

**विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित महाविद्यालयातील उमेदवाराला, विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करुन देण्याची मागणी करता येईल.**

४. विद्यार्थी कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त शैक्षणिक संस्थेमध्ये बदली होऊन जाऊ शकत नाही.

५. अधिसंख्य जागेतील कोट्यावर प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना संस्था बदलून घेता येणार नाही. ( J & K Quota आणि Allotted Seat Type General EWS या अधिसंख्य कोट्यावर प्रवेशित विद्यार्थी संस्था बदलून घेण्यासाठी पात्र असणार नाहीत.) याकरिता अर्जासोबत महाविद्यालय वाटप पत्र (Allotment Letter) जोडणे आवश्यक आहे.

६. सदरहू बदल हे प्रथम वर्षाच्या किवा संबंधित वर्षाच्या गुणांच्या आधारे करण्यात येतील, विद्यापीठ बदल असल्यास पुर्वीच्या विद्यापीठातील विषय व सद्यस्थितीच्या विद्यापीठातील विषय समकक्ष असलेबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्राचार्याची असेल.

७. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना विधी ३ वर्षीय अभ्यासक्रमासाठी दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षासाठी तसेच विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या किंवा तिसऱ्या किंवा चौथ्या किंवा पाचव्या वर्षाकरिता महाविद्यालय बदल करणेसाठी अर्ज करता येईल, याकरिता -

- दुसऱ्या वर्षामध्ये बदल करण्याकरिता सदरहू विद्यार्थी प्रथम वर्षामध्ये (प्रथम व द्वितीय सत्र) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- तिसऱ्या वर्षामध्ये बदल करण्यासाटी पहिले आणि दुसरे वर्ष (पहिले, दुसरे, तिसरे आणि चौथे सत्र) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- चौथ्या वर्षामध्ये बदल करण्यासाठी पहिले, दुसरे आणि तिसरे वर्ष (पहिले, दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे आणि सहावे सत्र) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- पाचव्या वर्षामध्ये बदल करण्यासाठी पहिले, दुसरे, तिसरे आणि चौथे वर्ष (पहिले, दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे, सहावे, सातवे आणि आठवे सत्र) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्यांना एका महाविद्यालयामध्ये बदलीबाबतचा अर्ज सादर करता येईल, अर्जासोबत पूर्वीच्या महाविद्यालयाचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र (Original NOC) सादर करणे बंधनकारक आहे. सबब, अर्ज करतेवेळी विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयातील रिक्त जागा विचारात घेवून अर्ज करावा. सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र हे सोबतच्या तक्त्यामध्ये नमूद कालावधीमधील असणे आवश्यक आहे. दि. ०२.०८.२०२५ रोजी पूर्वी घेण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

९. महाविद्यालयाने गुणपत्रक वितरीत केलेले नसल्यास, सदरहू महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांला प्राप्त असलेले गुण, सेमेस्टर तपशील, उत्तीर्ण-अनुत्तीर्ण नमूद करुन व त्यावर महाविद्यालयाचा शिक्का व प्राचार्यांची सही असणे आवश्यक आहे. सदरहू तपशील स्पष्ट व वाचनीय असावा, अस्पष्ट छायांकित प्रत, उक्त तपशील नमूद नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१०. विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयामध्ये बदलीने प्रवेश घ्यावयाचा आहे (Aspiring Institute) त्या संस्थेत / महाविद्यालयाकडे सोबतच्या Annexure A मधील विहित नमुन्यातील विनंती अर्ज, सध्या शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र (Original NOC), शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, सर्व सत्रामध्ये उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक, महाविद्यालय वाटप पत्र (Allotment Letter), महाविद्यालय बदलीच्या कारणाच्या पृष्ट्यर्थ पुरावे इ. दस्ताऐवजासह जमा करावा.

११. संस्थेच्या / महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या शिफारशी / ना-हरकत प्रमाणपत्रशिवाय उच्च शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करुन घेतला जाणार नाही.

**महाविद्यालयांनी करावयाची कार्यवाही : -**

१) महाविद्यालयांनी सदर परिपत्रक व रिक्त जागांचा तपशील सुचना फलकावर प्रदर्शित करावा.

२) विद्यार्थ्यांनी ज्या संस्थेमध्ये महाविद्यालयात बदलासाठी विनंती केली आहे त्या संस्थेच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचेकडे प्राप्त विनंती अर्जामध्ये नमूद माहितीची, त्यासोबतच्या कागदपत्रांच्या आधारे तपासणी करावी, त्रुटी आढळून आल्यास / गुणपत्रक किंवा ना-हरकत प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास त्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्रूटीपुर्तता करुन घ्यावी.

३) विद्यार्थ्यांच्या अर्जामधील माहितीच्या व दस्तऐवजांच्या आधारे यासोबतच्या Annexure B & C मध्ये अचूक माहिती सादर करावी, तसेच गुणपत्रकात गुणांऐवजी श्रेणी / श्रेयांक नमूद असल्यास सदर श्रेणी / श्रेयांकाचे संपूर्ण गुणांमध्ये अथवा टक्क्यांमध्ये रुपांतरित करुन गुण / टक्के नमूद करावेत.

४) **महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर प्राप्त अर्जाची पडताळणी करावी, पडताळणी करतेवेळी विद्यार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज, अर्जामधील संपूर्ण माहिती भरलेली आहे, पुर्वीच्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, प्रथम / द्वितीय / तृतीय / चतुर्थ वर्षाचे गुणपत्रक सोबत जोडलेले आहे, याची खात्री करावी, तद्नंतरच परिपूर्ण प्रस्ताव शिफारशींसह संचालनालयास विहीत मुदतीत सादर करण्यात यावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.**

५) संस्था बदलासाठी विद्यार्थ्यांनी ज्या संस्थेसाठी / महाविद्यालयासाठी विनंती केलेली आहे त्या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही ही सोबत जोडलेल्या कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. सदरहू बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी महाविद्यालयांची असल्याने विद्यार्थी किवा पालक यांना या कार्यालयात व्यक्तीशः पाठविण्याची आवश्यकत नाही.

६) महाविद्यालय बदल करणेबाबत महाविद्यालयाच्या मुळ ना-हरकत प्रमाणपत्राची (Original NOC) तपासणी करावयची असल्याने ई-मेल द्वारे प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

विद्यार्थ्यांकडून थेट संचालनालयाकडे सादर अर्जाची दखल घेतली जाणार नाही. सदरहू अर्ज दप्तरी दाखल करण्यात येऊन त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी. संदर्भ क्र. ३ येथील विनियमातील तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करताना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्या-त्या स्तरावरील प्राधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 01-08-2025 12:28:10

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

---

## पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदलासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयामध्ये बदलीने प्रवेश घ्यायचा आहे त्या ठिकाणी सहपत्रांसह (मूळ ना-हरकत प्रमाणपत्र, गुणपत्रिका इ.) प्रत्यक्ष अर्ज सादर करणे. | दि. ०२/०८/२०२५ ते दि. १३/०८/२०२५. |
| २. | महाविद्यालयांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जांची तपासणी करुन अर्जामध्ये त्रूटी असल्यास संबंधित विद्यार्थ्यांना ईमेलद्वारे कळविणे. | दि. ०४/०८/२०२५ ते दि. १८/०८/२०२५. |
| ३. | विद्यार्थ्यांना अर्जाबाबत त्रूटी प्राप्त झालेली असल्यास सदरहू त्रूटी पुर्ततेसाठी महाविद्यालयाकडे कागदपत्रे हस्तपोच करणे. | दि. ०४/०८/२०२५ ते दि. २२/०८/२०२५. |
| ४. | महाविद्यालयाद्वारे प्रस्ताव संचालनालयास सादर करणे. (प्रस्तावासोबत पात्र विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांचे मूळ अर्ज सर्व सहपत्रांसह सादर करावेत.) (ईमेलद्वारे प्राप्त अर्ज / प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाही.) | दिनांक २६/०८/२०२५ रोजी दुपारी ४ पर्यंत |
| ५. | संचालनालय स्तरावर गठीत समितीमार्फत महाविद्यालय बदलण्यासाठी आलेल्या प्रस्तावाची पडताळणी. | दि. २८/०८/२०२५ ते दिनांक ०४/०९/२०२५. |
| ६. | महाविद्यालय बदलण्यासाठी संचालनालय स्तरावरुन परवानगी देण्यात आलेल्या व परवानगी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाला कळविणे. | दि. ०८/०९/२०२५ सायं ०५.०० वा. |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज सहपत्रांसह, महाविद्यालयाची शिफारस व Annexure B & C मधील माहिती संचालनालयास दिनांक २६/०८/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत जमा करावी यावी. दिनांक २६/०८/२०२५ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

******

## ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF INSTITUTION AFTER 1st Year

1. Name of the Student (Surname First) :
2. Name of the Course :
3. CET Pass Year :
4. Current Year of Course (First / Second etc.) :
5. Academic year in which seeking transfer :
6. Whether Admission is under Supernumerary quota (J&K /EWS) : (Yes / No)
7. Address for correspondence :
   Mobile No. & Email ID :
   :
8. Name of the Present Institute : ______________________
   : ______________________
9. Status of Present Institute ( Govt. / Aided : ______________________
   Unaided / University Managed College etc.) : ______________________

**Details of the Result of the last exam.**

| Academic Year | Semester | Month &Year of Passing | Obtained Marks | Total Marks | Percentage | Pass / Fail / ATKT |
|---|---|---|---|---|---|---|
| | First | | | | | |
| | Second | | | | | |
| | Third | | | | | |
| | Fourth | | | | | |
| | Firth | | | | | |
| | Sixth | | | | | |
| | Seventh | | | | | |
| | Eighth | | | | | |

10. Details of backlog subject ( if any) :
    :
11. Name of aspiring institute where : ______________________
    Admission by transfer is sought ______________________
12. Status of the aspiring institute ( Govt. / Aided :
    Unaided / University Managed College etc.) :
13. Reasons for asking the transfer of :
    Institute / Change of University
    :

I the undersigned state on solemn declaration that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date :** ( Name & Signature of the Student )

# Annexure - B

## Statement Showing the list of Candidate applied for change of Institute after 1rst Year

**Name of the College :**

**Name of the Course :**

**Name of the University to which college is affiliated:**

| Sr. No. | Name of the Students | Name of the Current Institute | Year and Course | Whether Admission is under Supernumerary quota ( Y/N) | Total Marks obtained out of | % of Marks | Details of backlog subject ( if any) | Name of the aspiring Institute | Reason for Transfer | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |

Date : / / Seal of the College / Institute Signature of Principal

( Note - Kindly submit Annexure - B Course wise Separately )

Annexure - C

## Statement Showing Vacancy Position for Academic Year 2025-26

**Name of the College:**

**Name of the Course:**

**Name of the University to which college is affiliated:**

| Sr. No | Name of Course | Year | Sanctioned Intake 2025-26 * | Students admitted A.Y. 2025-26 ( as per Col. 4 ) | Vacancy ( Col. 4-5) | Student in pipeline (Backlog students) | Students Shifted due to change of college | Net Vacancy available [ (6+8)-7] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | Second | | | | | | |
| | | Third | | | | | | |
| | | Fourth | | | | | | |
| | | Final | | | | | | |
| | | | | | | | | |

Date: / / Seal of the College / Institute Signature of Principal

(Note - Kindly submit Annexure - C Course wise separately)

*Sanctioned Intake - As per Government.